MAHARASHTRA STATE COUNCIL
FOR OCCUPATIONAL THERAPY & PHYSIOTHERAPY, MUMBAI
महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई
St. George's Campus Hospital, Behind C.S.T. Station, Ph. 22620408 Mobil No.9224586392

# दिनांक १ जानेवारी, २०१० पासुन

सदस्यत्वाची नोंदणीकरण्याकरिता वरील कार्यालयात संपर्क साधावा. नोंदणी करण्याकरिता खालील बाबींची पुर्तता अनिवार्य आहे.

१) अर्जाची (फॉर्मची) किंमत रु.५०० शुल्क म्हणुन धनाकर्षाद्वारे देण्यात यावी. (एनआरआय वगळुन)

२) धनाकर्ष (डी.डी.) Registrar, Maharashtra State OTPT Council ,Mumbai या नावाने पाठवावा. धनाकर्षच्या मागे स्वतःचे नाव व फोन नं. लिहावा. **(धनाकर्ष हा फक्त राष्ट्रीयकृत बॅंकेचाच असावा).**

३) अर्जावर एक पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर संस्थेच्या प्राचार्यांची (ज्या संस्थेमधुन पदवी प्राप्त केली असेल त्या) स्वाक्षरी आवश्यक आहे.

४) अर्जासोबत चार पासपोर्ट आकराचे फोटो देण्यात यावेत.
- अ) अर्जावर लावण्याकरिता ३.५से.मी बाय ३.५से.मी. चे २ फोटो.
- ब) ओळखपत्राकरिता २.५ से.मी बाय २.५से.मी. चा १ फोटो.
- क) प्रमाणपत्राकरिता ३.५से.मी. बाय २.५ चा १ फोटो.

५) खालील मुळ प्रमाणपत्र –
- अ) पदवी प्रमाणपत्र
- ब) माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र (एस.एस.सी.)
- क) उच्च माध्यमिक परिक्षा प्रमाणपत्र.
- ड) शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला किंवा जन्म नोंदणी दाखला.

६) वरील प्रमाणपत्राच्या प्रत्येकी दोन साक्षांकित प्रती जोडाव्यात तसेच अर्ज भरताना सर्व मुळ प्रमाणपत्र आणावेत. (पदवी प्राप्त केलेल्या शैक्षणिक संस्थाच्या प्राचर्यांनी साक्षांकीत करावी.)

७) अर्जावर सुध्दा पदवी प्राप्त केलेल्या शैक्षणिक संस्थाच्या प्राचार्यांची स्वाक्षरी घ्यावी तसेच अर्ज भरतांना त्यावरील **नाव इंग्रजी व मराठी दोन्ही भाषेतुन लिहावे** तसेच पत्ता व दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी नमूद करावा.

८) महाराष्ट्रा बाहेरील युनिर्व्हसिटी मधील सदस्यांनी ज्या संस्थेतुन पदवी प्राप्त केली असेल त्या सदस्यांनी त्या संस्थेचा सिल्यॅबस व ट्रान्सक्रिप्ट ची कॉपी अर्जासोबत जोडावी.

९) दिनांक १ जानेवारी २०१० पासुन नोंदणी अर्जाचे शुल्क व नोंदणी शुल्क पुढीलप्रमाणे
- अ) महाराष्ट्रातंर्गत फॉर्म फी रु.५०० व नोंदणी फी रु.२५००.
- ब) महाराष्ट्रा बाहेरील परंतु भारतांतर्गत फॉर्म फी रु.५०० व नोंदणी फी रु५०००.
- क) अनिवासी भारतीयांसाठी (एनआरआय) फॉर्म फी रु.५००० व नोंदणी फी रु.२५०००.